संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# शालाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण झाले शिक्षण कधी ?

**आजच्या** माहिती तंत्रज्ञानाच्या युगातसुध्दा शिक्षणाचा प्रसार करण्यात जर सरकार आणि समाज मागे राहात असेल तर, याच्याइतके दुसरे दुर्दैव नाही. नुकत्याच झालेल्या शालाबाह्य विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षणामध्ये संपूर्ण देशभर साठ लाख मुले ही शालेय शिक्षणापासून वंचित असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. अर्थात हे सर्वेक्षण काही फार काटेकोरपणे केले गेले आहे असे म्हणता येत नाही. सरकारी कामकाजाप्रमाणे आणि कार्यपध्दतीप्रमाणे ही साठ लाखाची संख्या कागदोपत्री समोर आली आहे. परंतु आमचे असे ठाम मत आहे की, ही शालाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या निश्चितच दुप्पट किंवा तिप्पट असू शकते. कारण हे शालाबाह्य विद्यार्थी आपले पोट भरण्याकरता इकडे तिकडे भटकत असतात. मुंबईसारख्या महानगरातच या शालाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या दहा हजारापेक्षा जास्त असल्याचे आढळून आले. तर शेजारच्या ठाणे जिल्ह्यात ही संख्या सात हजार असल्याचे नोंदले गेले. महाराष्ट्रामध्ये ही संख्या पंचवीस हजाराच्यावर आहे. यावरून विविध कारणांमुळे शाळेत न जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या निश्चितच यापेक्षा जास्त असू शकते. सरकारने एकीकडे सर्वशिक्षा अभियानाची सुरुवात केली. शिक्षण हा घटनात्मक हक्क मानला गेला. तरीदेखील देशभरातील एक कोटीच्या आसपास मुलं जर अगदी प्राथमिक किंवा मुलभूत शिक्षणापासून वंचित राहतात, याचा अर्थ ध्येयधोरणांच्या अंमलबजावणीमध्ये आधीच निरक्षरता आहे की काय असे वाटायला लागते. इतक्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी शाळेबाहेर का राहतात याचादेखील मुद्दा गंभीरपणे आढावा घेतला गेला पाहिजे. ज्यामध्ये प्रामुख्याने गरीबी हे कारण आढळून येते आणि आता देखील सरकारी आकडेवारीप्रमाणे जे साठ लाख विद्यार्थी शाळेबाहेर आहेत. त्यामध्ये पन्नास टक्के विद्यार्थी हे अनुसुचित जाती जमातींमधले असल्याचे दिसून आले. याचा अर्थ आर्थिक दूरावस्था किंवा गरीबी दारिद्र्य हे त्याचे प्रमुख कारण मानावे लागेल. अन्यथा इच्छा आणि पैसा असूनही शिक्षण न घेण्याचे कोणतेही कारण असू शकत नाही. सरकार आपल्या अंदाजपत्रकांमध्ये शिक्षणासाठी भरपूर तरतूद करीत असते. प्राथमिक माध्यमिक शिक्षण या गरीब वर्गाला सहजपणे उपलब्ध व्हावे किंवा मोफत मिळावे यासाठीही प्रयत्न करीत असते. तरीदेखील एवढ्या मोठ्या संख्येने शालाबाह्य विद्यार्थी नोंदले जावेत हे गंभीर ठरते.

## धोरणातच निरक्षरता आहे का ?

अर्थात ही गोष्ट तितकीच खरी आहे की, शिक्षणाचा केवळ हक्क देऊन किंवा अधिकार देऊन थांबणार नाही त्याबरोबर आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गाला मोफत शिक्षण मिळणे ही आजची गरज आहे. तर मध्यम वर्गीय समाजाला हेच शिक्षण आपल्या खिशाला परवडणारे ठरले पाहिजे. दुर्दैवाने आज सरकार केवळ शिक्षणाचा हक्क आणि अधिकार देते परंतु शाळांना अनुदान देत नाही. शिक्षकांचे पगार द्यायला सरकारकडे पैसा नसतो. खेड्यापाड्यातील किंवा आदिवासी वस्त्यांमधील शाळांची स्थिती अतिशय वाईट स्वरुपाची आहे. तिथे शिक्षक जागेवर नसतातच. परंतु इमारतीसुध्दा जागेवर आहेत की नाहीत अशी आज तिथली परिस्थिती आहे. तर याउलट शहरांमध्ये अगदी नर्सरी केजीपासून ते इंजिनिअरिंग मेडिकलपर्यंत आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळा आणि महाविद्यालये निघत आहेत. यांना सरकारी अनुदान नाही त्यामुळे त्यांची फी ही वर्षाला एक लाखापासून ते दीड लाखापर्यंत असते. सीबीएससी, आयसीएससी अशा प्रकारच्या अभ्यासक्रमांचे आकर्षण दाखवून भरमसाठ फी उकळली जाते. एकीकडे शिक्षणापासून वंचित असलेल्या लाखो विद्यार्थ्यांचा वर्ग तर दुसरीकडे लाखो रुपये फी देऊन शाळेत जाणारा शहरी विद्यार्थी हा विरोधाभास पाहिल्यानंतर संपत्तीचा ओघ एकाच दिशेने वाहात आहे की काय असेच वाटू लागते. आणि ज्याला खऱ्या अर्थाने शिक्षणाची गरज आहे किंवा ज्याला खऱ्या अर्थाने विकासाच्या प्रक्रियेत सामावून घ्यायचे आहे. तो मात्र आपल्या या मुलभूत हक्कांपासून वंचित राहतो. शिक्षण हे प्रबोधनाचे फार मोठे माध्यम तर आहेच त्याहीपेक्षा त्यातून जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलतो. आणि स्वतःच्या साक्षरतेबरोबर देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाला फार मोठा हातभार लागतो. आज देशातली गरीबी, दारिद्र्य, अंधश्रध्दा याचे मुळ जर कशात असेल तर, ते निरक्षरतेमध्ये आहे. आणि या निरक्षरतेमध्ये आढळणारे हे शालाबाह्य विद्यार्थ्यांचे प्रमाण निश्चितच विचार करण्यासारखे ठरते.

## व्यापक मोहीम हवी

बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाविषयी फार मुलभूत विचार मांडले होते. एकवेळेला पोटाला अन्न मिळाले नाही तरी चालेल. परंतु शिक्षण घेतले पाहिजे इतका त्यांचा शिक्षणाविषयी कटाक्ष होता. संस्कृती आणि शिक्षण हाही एक त्यातला महत्त्वाचा घटक ठरतो. समाजामध्ये पोट भरण्यासाठी शिक्षण किंवा केवळ साक्षरतेसाठी शिक्षण असा विचार करून चालणार नाही. तर जगण्यासाठी काही सिध्दांत सांगण्याचे काम शिक्षणातून होत असते. आणि म्हणूनच सर्वांना समान पध्दतीने अधिकाधिक शिक्षण दिले जाणे हीसुध्दा देशाची शैक्षणिक संस्कृती असू शकते. ही अद्याप आपल्याकडे रुजलेली नाही असे म्हणणे भाग पडते. आज या शालाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करून चालणार नाही तर, त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सामिल करून घेण्यासाठी सरकार कोणती उपाययोजना करणार आहे, हे समोर आले पाहिजे, आज महाराष्ट्रासारख्या प्रबोधनाची परंपरा असलेल्या राज्यात भटक्या विमुक्त जमातीची अनेक मुले त्यांची पालकांबरोबर फिरस्ती राहात असल्यामुळे शिक्षण घेऊ शकत नाही. ऊस तोडणी करणाऱ्या कामगारांची मुले किंवा मुंबईसारख्या महानगरीत मोठमोठ्या इमारतींचे बांधकाम करणाऱ्या कारागिरांची मुले शाळेची ओळखही करून घेऊ शकत नाहीत. याचा अर्थ आता या विद्यार्थ्यांपर्यंत शाळा कशी पोहचेल किंवा त्यांना शाळेपर्यंत कसे आणता येईल अशा योजनांचा विचार करावा लागेल. फिरती शाळा हा त्यावरचा उपाय असू शकतो. ज्या ज्या ठिकाणी आवश्यकता असेल त्या त्या ठिकाणी या शालाबाह्य विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याचे काम करता येईल, मात्र त्यासाठी सर्वेक्षणाची जशी मोहीम राबवली गेली तशी त्यांच्या शिक्षणासाठी व्यापक मोहीम राबवावी लागेल.